Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# आदिवासी भागातील माध्यमिक स्तरावरील मुला मुलींमध्ये लैंगिक असमानता दूर करण्यासाठी राबवलेल्या कृती उपक्रमांच्या परिणामकारकतेचा अभ्यास

**दिनेश साळुंके,** संशोधक, म. वि. प्र. समाजाचे, ॲड. विठ्ठलराव हांडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक
**प्रा. डॉ. कैलास खोंडे,** मार्गदर्शक, म. वि. प्र. समाजाचे, ॲड. विठ्ठलराव हांडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक

**सारांश**

प्रस्तुत संशोधनात माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी प्रसार माध्यमांची माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमधील लैंगिक असमानता दूर करण्यासाठी राबवलेल्या विविध कृती उपक्रमांची परिणामकारकता अभ्यास करण्यासाठी संशोधकांनी प्रायोगिक संशोधन पद्धतीची निवड करण्यात आली होती. यासाठी सहेतुक नमुना निवड पद्धतीच्या आधारे माध्यमिक स्तरावरील 60 विद्यार्थ्यांना पूर्वचाचणी व उत्तर चाचणी देण्यात आली. पूर्वचाचणी देत असताना त्याचे मध्यमान प्रमाण विचलन या सांख्यिकीय तंत्राचा वापर केला. त्यानंतर संशोधकांनी प्रसार माध्यमांच्या आधारे विविध कृती उपक्रमांचा आधारित घेऊन लैंगिक असमानता दूर केली त्यानंतर विद्यार्थ्यांना लैंगिक असमानतेची उत्तर चाचणी देण्यात आली. विद्यार्थ्यांनी दिलेल्या प्रतिसादावरून असे दिसून येते की पूर्व आणि उत्तर चाचणी मध्ये विद्यार्थ्यांमधील खेळामधील व सहशालेय उपक्रम आतील लैंगिक असमानता प्रसारमाध्यमांचा आधारावर जे कृती उपक्रम राबवले त्यातून ती असमानता दूर होण्यास मदत झाली.

**प्रस्तावना**

भारतीय समाजाच्या विषम स्वरूपाची चर्चा करणे आणि शालेय शिक्षणाचे व्यवस्थापन हे केवळ वैविध्यपूर्ण नाही तर सर्व स्तरांवर असमानतेचे वैशिष्ट्य आहे. 2009 च्या शिक्षण हक्क कायद्याने (RTE) या असमानता दूर करण्याचा प्रयत्न केला, तथापि, शिक्षणाशी संबंधित कायदे बनवण्याच्या अधिकारांच्या वितरणाचे अर्धसंघीय स्वरूप आणि आर्थिक आणि मानवी संसाधनांमध्ये असमान प्रवेश, अंमलबजावणी असमान आहे. गळतीचे प्रमाण, माध्यमिक शिक्षण पूर्ण होण्याचे दर, शिक्षकांची नियुक्ती आणि शाळेतील उपलब्धता, विविध समुदाय/जाती आणि धर्मातील मुलांचा समावेश/वगळणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे लैंगिक समानता यामध्ये फरक विशेषतः लक्षणीय आहेत. ही असमानता दूर करण्यासाठी प्रसार माध्यमे काय उपयुक्त ठरू शकतात का प्रसारमाध्यमांवरही नागरी हिताचे मुद्दे मांडण्याची आणि कोणत्याही विचारसरणीचा प्रभाव न पडता गोष्टी बदलण्याचे काम करण्याची जबाबदारी आहे. यासाठी प्रत्येक वर्ग, जात, धर्म, समाजातील महिलांशी संबंधित बातम्यांना किती स्थान दिले जात आहे. महिलांशी संबंधित बातम्यांमध्ये दलित, बहुजन, आदिवासी आणि उपेक्षित घटकातील महिलांची बाजू अधिक पुढे ठेवण्याची गरज आहे. त्यासंबंधीच्या मुद्द्यांना किती जागा दिल्या जात आहेत, ते कसे दाखवले जात आहे, याकडेही लक्ष देण्याची गरज आहे. यासोबतच प्रत्येक सामाजिक, आर्थिक, राजकीय इत्यादी मुद्द्यांमध्ये सर्वसमावेशक लैंगिक दृष्टिकोन असावा. शिक्षणक्षेत्र देखील त्यापासून अलिप्त नाही. मुलगा किंवा मुलगी असा भेद न करता प्रत्येक मुलाला त्याच्या क्षमतेच्या विकासासाठी पूर्ण संधी मिळण्याचा अधिकार आहे.. पाठ्यपुस्तके, चित्रपट, प्रसारमाध्यमे इत्यादींमध्ये लिंगाच्या आधारावर त्यांच्याशी भेदभाव केला जातो. भारतातील लैंगिक असमानतेमुळे, संधींमध्येही


Copyright © | JET Network, All Rights Reserved

असमानता निर्माण होते, ज्यामुळे दोन्ही लिंगांवर परिणाम होतो, परंतु आकडेवारीच्या आधारे, बहुतेक मुली या भेदभावामुळे त्यांच्या संधींपासून वंचित राहतात.भारतातील मुला-मुलींचा बालपणीचा अनुभव खूप वेगळा आहे जिथे मुलांना मुलींपेक्षा जास्त स्वातंत्र्य आहे. मुलींच्या स्वातंत्र्यावर अनेक बंधने असली तरी या निर्बंधांचा परिणाम त्यांचे शिक्षण, विवाह आणि सामाजिक संबंध, स्वतःचा निर्णय घेण्याचा अधिकार इत्यादींवर होतो. लैंगिक असमानता आणि मुली आणि मुले यांच्यातील भेदभाव जसजसा वाढत जातो, तसतसा त्याचा प्रभाव त्यांच्या बालपणातच दिसून येत नाही तर ते प्रौढत्वात पोहोचल्यावर ते अधिक व्यापक होत जाते.

शिक्षणाच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक टप्प्यापासून या लैंगिक असमानतेची जाणीव ही सुरुवातीला कमी असली तरी उच्च शिक्षणापर्यंत ती वाढत जाते. त्यातील आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या संदर्भात ती अधिक असते. जसे मुलीचे वय वाढत जाते तस तसं ही लैंगिक असमानता अधिक वाढते अशावेळी संशोधकांच्या मनामध्ये विचार आला की या प्रसारमाध्यमांचा वापर करून आदिवासी भागातील मुला-मुलींमध्ये लैंगिक असमानता दूर करण्यासाठी पाठ्यपुस्तकातील अशाया बरोबरच इतर कृतीक्रम राबवले असता ही असमानता दूर करता येईल का यासाठी प्रस्तुत संशोधन कार्य संशोधकाने हाती घेतलेले होते.

**समस्या विधान:** प्रसार माध्यमांच्या आधारे माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमधील लैंगिक असमानता दूर करण्यासाठी राबवलेल्या कृती उपक्रमांच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे.

**उद्दिष्टे**

1. प्रसार माध्यमांच्या आधारे माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमधील खेळातील सहभागातील लैंगिक असमानता दूर करण्यासाठी राबवलेल्या कृती उपक्रमांच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे.
2. प्रसार माध्यमांच्या आधारे माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमधील सहशालेय उपक्रमातील लैंगिक असमानता दूर करण्यासाठी राबवलेल्या कृती उपक्रमांच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे.

**परिकल्पना**

1. प्रसार माध्यमांच्या आधारे माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमधील खेळातील सहभागातील लैंगिक असमानता दूर करण्यासाठी राबवलेल्या कृती उपक्रमांच्या माध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.
2. प्रसार माध्यमांच्या आधारे माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमधील सहशालेय उपक्रमातील लैंगिक असमानता दूर करण्यासाठी राबवलेल्या कृती उपक्रमांच्या माध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.

**संशोधन पद्धती -** प्रस्तुत संशोधनात प्रसार माध्यमांच्या आधारे माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमधील लैंगिक असमानता दूर करण्यासाठी प्रायोगिक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे.

**जनसंख्या:** प्रस्तुत संशोधनात माध्यमिक स्तरावरील प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांची जनसंख्या म्हणून निश्चिती करण्यात आली होती.

**न्यादर्श:** प्रस्तुत संशोधनात सहेतुक नमुना निवड पद्धतीने एकूण 60 माध्यमिक स्तरावरील मध्ये प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांची न्यादर्श निवड करण्यात आला होता.

**संशोधनाचे साधने**: प्रस्तुत संशोधनात विद्यार्थ्यांमधील लैंगिक असमानता अभ्यास करण्यासाठी 'स्व' निर्मित लैंगिक असमानता मापिकेचा अवलंब केला होता. या मीपिकेत एकूण 20 विधाने होती. खेळांमधील लैंगिक


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*([https://jetjournal.us/](https://jetjournal.us/))*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

असमानता तसेच सहशालेय उपक्रमातील सहभागाच्या संदर्भातील लैंगिक असमानता यावर आधारित प्रश्न होते.


**संख्याशास्त्रीय परिमाणे** - प्रस्तुत संशोधनात संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी टक्केवारी, मध्यमान, प्रमाणविचलन व 't' मूल्य या संख्याशास्त्रीय परिमाणांचा अवलंब करण्यात आला होता.

**माहितीचे विश्लेषण अर्थनिर्वाचन -** प्रसार माध्यमांच्या आधारे माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमधील लैंगिक असमानता दूर करण्यासाठी राबवलेल्या कृती उपक्रमांच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे.उपक्रम राबविल्यानंतर विद्यार्थ्यांनी दिलेल्या पूर्व उत्तर चाचणी च्या आधारे तुला करण्यात आली ती खालील प्रमाणे

**परिकल्पना 01:** प्रसार माध्यमांच्या आधारे माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमधील खेळातील सहभागातील लैंगिक असमानता दूर करण्यासाठी राबवलेल्या कृती उपक्रमांच्या माध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.

**तक्ता क्रमांक 01:**

| **खेळातील सहभागातील लैंगिक असमानता** | N | M | SD | Table 't' value | Obtained 't' value | Decision |
|---|---|---|---|---|---|---|
| पूर्व चाचणी | 60 | 22.78 | 5.42 | 2.00 | 4.51 | स्वीकार |
| उत्तर चाचणी | | 32.00 | 6.14 | | | |




**विश्लेषण व अर्थनिर्वचन:** स्वाधीनता मात्रा (58) साठी 0.05 सार्थकता स्तरावर टेबल 't' मूल्य 2.00 आहे. प्राप्त मूल्य 4.51 असून ते टेबल 't' मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा स्वीकार त्याग करावा लागेल यावरून असे दिसून येते की, प्रसार माध्यमांच्या आधारे माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमधील खेळातील सहभागातील लैंगिक असमानता दूर करण्यासाठी राबवलेल्या कृती कृती उपक्रमांची मालिका नंतर त्यात फरक दिसून येतो. यावरून असे म्हणता येईल की, माध्यमिक स्तरावरील प्रसारमाध्यमांचा विद्यार्थ्यांमधील



Copyright © | JET Network, All Rights Reserved

खेळातील असमानता दूर करण्यासाठी राबवलेल्या विविध कृती उपक्रमांच्या विद्यार्थ्यांमधील खेळातील सहभागाची लैंगिक असमानता दूर झालेली दिसून येते.

**परिकल्पना 02:** प्रसार माध्यमांच्या आधारे माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमधील सहशालेय उपक्रमातील लैंगिक असमानता दूर करण्यासाठी राबवलेल्या कृती उपक्रमांच्या माध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.

**तक्ता क्रमांक 02**

| **सहशालेय उपक्रमातील लैंगिक असमानता** | N | M | SD | Table 't' value | Obtained 't' value | Decision |
|---|---|---|---|---|---|---|
| पूर्व चाचणी | 60 | 24.52 | 6.40 | 2.00 | 5.22 | स्वीकार |
| उत्तर चाचणी | | 33.45 | 7.12 | | | |




**विश्लेषण व अर्थनिर्वचन:** स्वाधीनता मात्रा (58) साठी 0.05 सार्थकता स्तरावर टेबल 't' मूल्य 2.00 आहे. प्राप्त मूल्य 5.22 असून ते टेबल 't' मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा स्वीकार त्याग करावा लागेल यावरून असे दिसून येते की, प्रसार माध्यमांच्या आधारे माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमधील सहशालेय उपक्रमातील लैंगिक असमानता दूर करण्यासाठी राबवलेल्या कृती कृती उपक्रमांची मालिका नंतर त्यात फरक दिसून येतो. यावरून असे म्हणता येईल की, माध्यमिक स्तरावरील प्रसारमाध्यमांचा कृती उपक्रमांच्या विद्यार्थ्यांमधील सहशालेय उपक्रमातील सहभागाची लैंगिक असमानता दूर झालेली दिसून येते.

**निष्कर्ष**


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

1. माध्यमिक स्तरावरील प्रसारमाध्यमांचा विद्यार्थ्यांमधील खेळातील असमानता दूर करण्यासाठी राबवलेल्या विविध कृती उपक्रमांच्या विद्यार्थ्यांमधील खेळातील सहभागाची लैंगिक असमानता दूर झालेली दिसून येते.
2. माध्यमिक स्तरावरील प्रसारमाध्यमांचा कृती उपक्रमांच्या विद्यार्थ्यांमधील सहशालेय उपक्रमातील सहभागाची लैंगिक असमानता दूर झालेली दिसून येते.

**संदर्भग्रंथ सूची**


1. भितांडे, वि. रा. (2007). शैक्षणिक संशोधन पद्धती (प्रथम आवृत्ती). पुणे: नित्यनूतन प्रकाशन.
2. पंडित, बी. बी. (2007). शिक्षणातील संशोधन. (प्रथम आवृत्ती). पुणे: नित्यनूतन प्रकाशन.
3. मुळे व उमाठे. (1998). शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे. (तिसरी आवृत्ती). नागपूर: विद्या बुक्स प्रकाशन.
4. जगताप , ह . ना . ( 2007 ) शैक्षणिक मानसशास्त्र, पुणे , नरेंद्र प्रकाशन.
5. पंडित बन्सी बिहारी ( 2005). शिक्षणातील संशोधन (संख्यात्मक व गुणात्मक) (प्रथम आवृत्ती) पुणे : नित्यनुतन प्रकाशन
6. भिताडे , वि.रा. ( 2008) . शैक्षणिक संशोधनं पद्धती (पुनमुद्रण) पुणे : नुतन प्रकाशन .
7. कुलकर्णी डी. आर. (2008). प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र (प्रथम आवृत्ती). नागपूर विद्या प्रकाशन 5. आगलावे प्र. (2007). सामाजिक संशोधन पद्धती. पुणे. पुणे विध्यार्थी गृह प्रकाशन
8. बर्वे. बी . (2006) ताण आणि आरोग्यविषयक मानसशास्त्र (प्रथम आवृत्ती) नागपुर: विद्या प्रकाशन
9. घोरमोडे यु. के आणि घोरमोडे कला (२०१०) शैक्षणिक मागदर्शन आणि समुपदेशन (प्रथम आवृत्ती) नागपूर : विद्यप्रकाशन
10. करंदीकर , सुरेश (2007) शैक्षणिक मानसशास्त्र (द्वितीय आवृत्ती). कोल्हापूर फड़के प्रकाशन
11. पाटील , वा . भा . (2017) . संशोधन पद्धती , जळगांव, प्रशांत पब्लिकेशन.
12. देवगीकर आणि देवगीकर (2011). मन मनोविकास आणि समुपदेशन. नागपूर, श्रीसाईनाथ प्रकाशन.



Copyright © | JET Network, All Rights Reserved